**आजचा शुभ विचार**

""नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-46 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Friday 20 June 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ४६ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शुक्रवार, दि. २० जुन २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये


## भारतीय बुद्धिबळपटू दिव्या देशमुखची कमाल, पहिल्या क्रमांकाच्या होउ यिफानला हरवले

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

---------------------

लंडन येथे सुरू असलेल्या FIDE वर्ल्ड रॅपिड अँड ब्लिट्झ टीम चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय बुद्धिबळपटू दिव्या देशमुखने कमाल केली. दिव्याने पहिल्या क्रमांकाच्या होउ यिफानला हरवले. या कामगिरीसाठी पंतप्रधान मोदींनी दिव्याचे अभिनंदन केले. दिव्याने एक्स पोस्ट करत पंतप्रधान मोदींचे आभार मानले. संयम आणि दृढनिश्चयाने दिव्याने होउ यिफानचा पराभव केला. या कामगिरीसाठी दिव्याचे अभिनंदन असे पंतप्रधान मोदींनी



त्यांच्या शुभेच्छा संदेशात नमूद केले आहे. तर पंतप्रधानांकडून सन्मानित होणे खूप सन्मानाचे आणि प्रेरणादायी असल्याचे दिव्याने तिच्या एक्स पोस्टमध्ये नमूद केले आहे. नागपूरच्या १९ वर्षीय दिव्याने रुक-व्हर्सेस-बिशपच्या तणावपूर्ण अंतिम सामन्यात ७४ चालींमध्ये विजय मिळवण्यासाठी तिची प्रबळ इच्छाशक्ती आणि रणनीतिक कौशल्य दाखवले. दिव्याची कामगिरी बुद्धिबळ जगतात चर्चेचा विषय झाली आहे.

दिव्याने हेक्सामाइंड बुद्धिबळ क्लबच्यावतीने खेळत FIDE वर्ल्ड रॅपिड अँड ब्लिट्झ टीम चॅम्पियनशिप स्पर्धेत पहिल्या क्रमांकाच्या होउ यिफानला हरवले. दिव्याच्या कामगिरीमुळे अखेर ती ज्या संघाची सदस्य होती त्या संघाने ब्लिट्झमध्ये कांस्यपदक आणि रॅपिड स्वरूपात रौप्यपदक मिळवले. तिच्या वैयक्तिक पदकांमध्ये सांघिक रौप्य (रॅपिड), सांघिक कांस्य (ब्लिट्झ) आणि वैयक्तिक कांस्यपदक यांचा समावेश आहे. दिव्याने पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळताना उल्लेखनीय कामगिरी केली.

## "आम्ही कट्टर देशाभिमानी हिंदू, भ्रष्ट भाजपावाले घरोघरी 'सिंदूर' वाटणार होते": पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

यांचे केंद्रात सरकार आल्यानंतर पनवती लागलेली आहे. सगळ्या कामांची वाट लागलेली आहे. एअरपोर्टचे छत गळत आहे. मेट्रोच्या स्टेशनमध्ये पाणी जात आहे. प्रयागराजला माणसे चेंगरून गेली. कुणीही जबाबदारी घ्यायला तयार नाही. दिल्लीच्या रेल्वे स्टेशनवर माणसे चेंगरून गेली, त्याचीही जबाबदारी कुणी घेत नाही. काल परवा विमान अपघातात माणसे गेली, कोणी जबाबदारी घ्यायला तयार नाही. म्हणजेच काय गांभीर्याने विचार केला तर, आज आपल्या देशाला पंतप्रधानाची गरज आहे. हे पंतप्रधान देशाचे नाहीत, भाजपाचे पंतप्रधान आहेत. देशाला गृहमंत्र्यांची गरज आहे, घरफोड्या अमित शाहांची नाही, या शब्दांत उद्धव ठाकरे यांनी जोरदार हल्लाबोल केला.

वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे बोलत होते. यावेळेस उपस्थितांना संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी अनेक विषयांवर भाष्य केले. भाजपा, शिवसेना शिंदे गटावर सडकून टीका केली. हे वातावरण आणि असे प्रेम कोणाच्याही भाग्यात लिहिले असेल, असे वाटत नाही. अर्थात ही माझी पुण्याई नाही. ही माझ्या पूर्वजांची पुण्याई आहे आणि तुमचे अतोनात प्रेम आहे. येथील जयघोष विरोधांनी पाहिला, तरी नॅपकिनसकट सगळे कपडे ओले होतील, असा खोचक टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

पक्ष फोडला, चिन्ह चोरले, बाप चोरला. आता आमचे लोक नेत आहेत. शिवसेना संपत कशी नाही, उद्धव ठाकरे संपत कसा नाही, असा प्रश्न या लोकांना पडला आहे. शिवसेनाप्रमुखांनी रक्त आटवून शिवसेना नावाचे वादळ तयार केले आहे. पैसे फेकून तयार केलेली माणसे नाही, कट्टर शिवसेना धर्म पाळणारे शिवसैनिक आहेत. ५९ वर्ष पक्षाला झाली, यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. शिवसेना आजही तरुण आहे आणि तरुणच राहणार आहे. मला खरच कीव येते, जे आपला बाप बदलतात आणि राजकारणात पोरे होत नाही, अशी लोक आपल्या घराणेशाहीवर टीका करत आहेत. आमच्याकडून किती पोरे घेऊन जायची, तेवढी घेऊन जा, या शब्दांत पक्षातील गळतीवरून उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि शिवसेना ठाकरे गटावर निशाणा साधला.




भाजपा असाच आहे. निवडणूक जिंकण्यासाठी माता भगिनींना केलेला वादा, जनतेला केलेला वादा पक्ष पाळत नाही. याच पक्षाने आम्हाला अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद देण्याचा वादा केला होता आणि हे सांगत होते की, हे सगळे घडलेच नाही. मग तुम्ही आता निवडणुकीत जनतेला केलेला वादा खरा होता की खोटा होता? यातूनच यांची वृत्ती कळते. आम्ही कट्टर देशाभिमानी हिंदू आहोत. जो कोणी हा देश मानतो, त्यासाठी कुर्बानी द्यायला तयार असेल, ते आमचेच आहेत. यांना नावेही बरी सुचतात, 'ऑपरेशन सिंदूर'. पण भ्रष्ट भाजपावाले घरोघरी 'सिंदूर' वाटणार होते. कर्नर सोफिया कुरैशी यांच्याबाबत विधान करणाऱ्या विजय शाहाला चापकाने फोडून काढले पाहिजे, असा संताप उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. आम्ही इंडिया आघाडी म्हणून तुमच्यासमोर पर्याय ठेवला, तुमच्यासमोर उभे राहिलो, त्यावेळेस आमची तुलना इंडियन मुजाहिद्दीननशी करायला तुम्हाला लाज वाटली नाही का, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केला. आम्ही इंडियन मुजाहिद्दीनसारखे होतो. तर आज जगभरात तुम्ही न केलेल्या शौर्याचे कौतुक सांगण्यासाठी आमचे पक्षाचे खासदार तुम्ही का पाठवले. आम्ही इंडियान मुजाहिद्दीन मग तुम्ही कोण? अशी थेट विचारणा उद्धव ठाकरे यांनी केली.

वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे बोलत होते. यावेळेस उपस्थितांना संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी अनेक विषयांवर भाष्य केले. भाजपा, शिवसेना शिंदे गटावर सडकून टीका केली. तुम्ही जगभर फिरलात, पण या कठीण काळात एकही मित्र देश तुमच्यासोबत उभा राहिला नाही. आम्ही तुमच्यासोबत राहिलो. सगळे जग तुमच्या विरोधात आहे. देशातील मित्र तुम्ही तोडून टाकत आहात, संपवून टाकत आहात. आमची तुलना देशद्रोह्यांसोबत केली, पण संकट आल्यावर आमचेच खासदार जगभरात नेलेत, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

पक्ष वेगळे असतील, मतभेद असतील आणि आहेतही. परंतु, संपूर्ण जगासमोर जाताना आम्ही सगळे एक आहोत, याच भावनेने गेले पाहिजे. ते पवित्र कर्तव्य करण्याचा आम्ही प्रयत्न केला. मला पंतप्रधान मोदी आणि भाजपाला विचारायचे आहे की, तुमची हिंदुत्वाची व्याख्या नेमकी आहे तरी काय? तुम्ही आम्हाला सांगता की, हिंदूत्व सोडले, मग तुम्ही काय सोडले? मधेच मशिदीत जाऊन सौगात वाटता, घराघरात जाऊन शेंदूर वाटता. सैन्यातील महिला अधिकाऱ्याबाबत तुमचा मंत्री वादग्रस्त विधान करतो आणि तो अद्यापही पक्षात आहे. कारवाई होत नाही. ही अशी नालायक औलाद भाजपामध्ये आहे. या भाजपाकडून आपण देश सुधारण्याची भाषा करत आहोत. हे कसले देशात सुधारणा करणार. तुम्ही सैन्याचे पाय बांधले. सैन्याने धडक दिली होती. आतपर्यंत सैनिक गेले होते, आपण पाकिस्तान घेतलाही असता. पण ट्रम्प यांचा फोन आल्यावर यांचा आवाजच गेला. असे पंतप्रधान काय करायचे? असे गृहमंत्री काय करायचेत? चार दहशतवादी आत आले कसे? पर्यटकांना गोळ्या घालणारे दहशतवादी गेले कुठे? आकाशात गेले, पाताळात गेले की, भाजपात गेले? अजून मिळत कसे नाहीत? असा बोचरा सवाल उद्धव ठाकरेंनी यावेळी बोलताना केला.

दरम्यान, संपूर्ण देशाची भाजपाने वाट लावली. आता शिवसेना संपवायचे स्वप्न पाहत आहेत. अरे, तुम्ही कितीही स्वप्न पाहा, शिवसेना तुम्हाला संपवून सगळ्या भ्रष्टाचाऱ्यांना खतम करून तुमच्या छाताडावर भगवा रोवला नाहीतर शिवसेना म्हणून नाव सांगणार नाही, असा एल्गार उद्धव ठाकरे यांनी केला. एक गोष्ट लक्षात ठेवा की, आपल्याला आता भांडून चालणार नाही. भाजपाची नीतीच आहे. मुंबई महापालिकेसाठी आता हिंदू-हिंदूंमध्ये मारामाऱ्या लावत आहेत. हिंदी सक्तीची करायची, हिंदी सक्तीची होऊ देणारच नाही, हिंमत असेल तर देवेंद्र फडणवीसांनी करून पाहावी, असे खुले आणि जाहीर आव्हान उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोलताना दिले.

## तिसरी भाषा न शिकल्यास महाराष्ट्रातच मराठी मुले मागे पडतील, शिक्षण विभागाची माहिती

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये तिसरी भाषा (हिंदी) इयत्ता पहिलीपासून इतर माध्यमांच्या शाळांप्रमाणे न शिकविल्यास महाराष्ट्रातच मराठी मुले मागे पडतील. तसेच तिसरी भाषा मुलांना अतिशय सोप्या स्तरावर शिकविल्यामुळे विद्यार्थ्यांना आणखी एक कौशल्य आत्मसात करता येईल आणि त्याचा त्यांच्या बौद्धिक विकासावर सकारात्मक परिणाम होईल, अशी माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

भविष्यामध्ये संपूर्ण देशामध्ये राबविण्यात येणाऱ्या अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट या मूल्यमापनाच्या संकल्पनेमध्ये निश्चित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार एखाद्या विद्यार्थ्याने किती विषय किंवा कला शिकलेल्या आहेत, त्यासाठी त्याने किती वेळ दिलेला आहे. यावरून त्या विद्यार्थ्याला त्या शिक्षणासाठीचे पॉइंट्स मिळण्याची व्यवस्था होणार आहे. त्यामुळे मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी तिसरी भाषा न शिकल्याने इयत्ता पहिली ते पाचवीसाठी एका विषयाचे संपूर्ण क्रेडिट पॉइंट्स त्यांना मिळणार नाहीत. परिणामी 'अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट' या




संकल्पनेमुळे महाराष्ट्रातच मराठी मुले अन्य माध्यमांच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे पडतील, अशी माहिती शिक्षण विभागाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

इतर माध्यमांच्या शाळांमध्ये पहिलीपासून अतिशय सोप्या स्तरावर मराठी भाषा शिकवण्यात येते, त्याच समान स्तरावर मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मुलांना तिसरी भाषा इयत्ता पहिलीपासून शिकविल्यामुळे त्यांना आणखी एक कौशल्य आत्मसात करता येईल. त्याचा त्यांच्या बौद्धिक विकासावर सकारात्मक परिणाम होईल, असे शिक्षण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्रामध्ये हिंदी भाषा ही दैनंदिन जीवनामध्ये सुद्धा अगदी लहानपणापासून विद्यार्थ्यांच्या सभोवतालच्या वातावरणात असल्यामुळे, महाराष्ट्रातील मुलांना या भाषेचा ताण शैक्षणिकदृष्ट्या मुळीच असणार नाही याची खात्रीही करण्यात येईल. तसेच जे पालक हिंदी व्यतिरिक्त इतर भाषा निवडतील त्यांचेही या बाबतीमध्ये शिक्षकांमार्फत समुपदेशन करून विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या सभोवताली असणारी योग्य ती भाषा निवडण्याची आणि ती शिकवण्याची योग्य व्यवस्था शिक्षण विभागाच्या आयुक्तांकडून करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्रामध्ये मराठी व इंग्रजी व्यतिरिक्त इतर माध्यमांच्या राज्य मंडळाच्या शाळांमध्ये मराठी ही भाषा काही वर्षांपासून माध्यम भाषा व इंग्रजी भाषेसह शिकवण्यात येत आहे. या विद्यार्थ्यांचे प्रमाण एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत दहा टक्के म्हणजेच इयत्ता पहिलीसाठी अंदाजे २० लाख विद्यार्थ्यांपैकी २ लाख विद्यार्थी इतके आहे. या विद्यार्थ्यांना शिकवण्यात येणारी मराठी भाषा ही केवळ श्रवण-संभाषण स्वरूपामध्येच सुरुवातीला शिकवण्यात येते आणि त्याविषयीचे लेखन वाचन कौशल्य फार कमी वेगाने पुढील वर्गामध्ये शिकवले जाते. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त ताण येऊ नये हाच यामागील उद्देश आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांमध्ये शिक्षक स्वतःहून आपल्या विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावरच विविध विदेशी भाषा सुद्धा शिकवतात.

## उद्धव ठाकरे रंग बदलणारा सरडा एकनाथ शिंदेंची ठाकरेंवर टीका

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

बाळासाहेबांच्या विचारांचा आणि शिवसेनेचा विश्वासघात उद्धव ठाकरे यांनी केला. सरडाही रंग बदलतो, पण यांच्या इतके लवकर नाही. बाळासाहेबांनी हिंदुत्वासाठी मतदानाचा अधिकार गमावला, पण हिंदुत्व सोडलं नाही. पण त्यांचे वारसदार म्हणवणारे सत्तेसाठी लाचार झाले. बाळासाहेब असते तर यांना उलटं टांगून खालून मिरचीचा धूर दिला असता, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंवर केली.

मुंबईतील वरळी डोम येथे शिंदे गटाचा ५९ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला, यावेळी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना अनेक प्रश्न उपस्थितीत केले. वर्धापन दिन सोहळ्यात बोलताना, कम ऑन किल मी, हिंमत असेल तर या अंगावर असे उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरेंच्या या टीकेला प्रत्युत्तर देताना एकनाथ शिंदे यांनी खिल्ली उडवली.एकनाथ शिंदे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी भाषणात म्हटले की, कमॉन कील मी. मला वाटतं ते इंग्लिश पिक्चर बघून आले असतील. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, मेलेल्या माणसाला काय मारणार? कारण महाराष्ट्राच्या जनतेनं विधानसभेच्या निवडणुकीत तुमचा मुडदा पाडलेला आहे. वाघाच कातडं पांघरून लांडगा वाघ होत नाही. त्यासाठी वाघाचा काळीज आणि मनगटात जोर लागतो. तो दम शिवसैनिकात आहे. त्यामुळे आमच्या नादाला तुम्ही लागू नका. तुमचा टांगा पलटी घोडं फरार आम्ही केलं आहे.



बाळासाहेबांचा आणि आनंद दिघेंचा सच्चा कार्यकर्ता मी आहे, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

बाळासाहेबांनी आयुष्यभर काँग्रेसचा विरोध केला. मात्र या लोकांनी शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधण्याचे काम केले. ठाकरे गटाने महाराष्ट्राचा विश्वासघात केला आहे. मुख्यमंत्रीपदासाठी झाले लाचार ते काय होणार बाळासाहेबांचे वारसदार, असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल करताना सत्तेच्या खुर्चीसाठी कधीही आम्ही तडजोड करणार नाही. हिंदुत्वाची आम्ही कधी प्रतारणा करणार नाही, असे वचन आम्ही दिले आहे. मात्र काही लोकांना निवडणुका आल्यावर कार्यकर्त्यांची आठवण येते. एरव्ही 'हम दो, हमारे दो' असे म्हणत ठाकरेंवर टीका केली.

आपला मेळावा हा बाळासाहेबांच्या विचारांचा आहे. तर दुसरा मेळावा हा सत्तेसाठी लाचार झालेल्यांचा आहे असे म्हणत सुरुवातीलाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटावर हल्लाबोल केला. हिंदुत्वाचा भगवा आपल्याकडे आहे. शिवधनुष्य आपल्याकडे आहे आणि जनतेचा आशिर्वाद देखील आपल्याकडे आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले. आपल्या पक्षात जी वाढ होतेय ही सर्वांच्या मेहनीची आहे. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण याचेच हे प्रतिबिंब असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

राक्षसाचा जीव जसा पोपटात असतो, तसा यांचा जीव बीएमसीच्या तिजोरीत आहे. सध्या मुंबईचा लढा कॅम्पेन सुरू केले आहे. हा लढा आता आठवला, सत्तेत असताना काय केलं? लढायला घराबाहेर तर पडायला हवे. घरात बसून काही होत नाही. आता जे काही घरातून बाहेर पडत आहात त्या मागे श्रीकांत शिंदे आहे. मुंबई महाराष्ट्राची आहे आणि कुणाचा बाप जरी आला तरी मुंबई महाराष्ट्रापासून कुणी तोडू शकणार नाही.

बाळासाहेबानंतर तुम्ही मराठी माणसांसाठी काय केले? याचा हिशोब द्या, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना सवाल केला. आता म्हणतात, आम्ही हिंदुत्व सोडले नाही. मग बाळासाहेबांना हिंदूहृदयसम्राट तुम्ही का म्हणत नाही, असा सवाल देखील एकनाथ शिंदे यांनी केला. हिंदुत्व आमचा श्वास आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

भाषणात उद्धव ठाकरे म्हणाले 'कमॉन कील मी'. पण मी म्हणतो मेलेल्या माणसाला काय मारणार. महाराष्ट्राच्या जनतेने विधानसभेच्या निवडणुकीत तुमचा मुडदा पाडलेला आहे. वाघाचे कातडे पांघरुन लांडगा वाघ होत नाही, असे एकनाथ शिंदे म्हणाले. त्यासाठी वाघाचे काळीज आणि मनगटात जोर लागतो. तो दम शिवसैनिकात आहे. आमच्या नादाला तुम्ही लागू नका. तुमचा टांगा पलटी, घोडे फरार आम्ही केले आहे. बाळासाहेबांचा आणि आनंद दिघेंचा सच्चा कार्यकर्ता मी असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

संपादकीय

# महामुंबई होणार जागतिक ज्ञान नगरी!

परदेशात शिक्षण घेणे हे प्रत्येक उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे सर्वात सामान्य स्वप्नांपैकी एक असते. परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेण्याची संधी ही त्या विद्यार्थ्याला संपूर्ण जगाचा अनुभव घेण्यास मदत करते. परदेशात शिक्षणासाठी प्रवास करण्याची, नवीन संस्कृती शिकण्याची, नवीन लोकांना भेटण्याची संधी परदेशी शिक्षणातून मिळते आणि यातून त्या विद्यार्थ्याचा जागतिक दृष्टिकोन बदलतो. गेल्या काही वर्षांमध्ये भारतातून आणि महाराष्ट्रातून परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. परदेशी विद्यापीठातील सध्याचा शैक्षणिक खर्च, राहण्याचा खर्च, विमा खर्च, अभ्यास साहित्याचा खर्च यांसह अनेक खर्च असतात. या खर्चामुळे पालकांवर आर्थिक ताण येतो, पण पालक मुलांचे उज्ज्वल भविष्य निश्चित करण्यासाठी हा आर्थिक ताण पेलण्यास तयार असतात. आता ही परिस्थिती हळूहळू बदलणार आहे.

शासनाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार परदेशातील विद्यापीठ भारतात येणार आहेत आणि यामध्ये महाराष्ट्राने पुढाकार घेतला आहे. नवी मुंबईत पाच परदेशी विद्यापीठ सुरू होत आहेत. विशेष म्हणजे महाराष्ट्रात एकाच वेळी पाच परदेशी विद्यापीठे नवी मुंबईच्या एकाच ठिकाणी येणे ही पहिलीच वेळ आहे. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे भारतातील पहिले शैक्षणिक हब एज्युसिटी मुंबई / नवी मुंबईत आकाराला येत आहे. नवी मुंबईत सिडको साकारत असलेल्या शैक्षणिक हबमध्ये ५ आंतरराष्ट्रीय विद्यापीठे असणार आहेत. भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक आणि मानाचा क्षण निर्माण झाला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP), २०२० अंतर्गत भारतात उच्च शिक्षण क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना मुंबईत संकुल स्थापन करण्यासाठी LOI (आशयपत्र) प्रदान करण्याची पहिलीच ऐतिहासिक घटना असून यामुळे मुंबईचा जागतिक शैक्षणिक नकाशावर ठसा उमटणार आहे.

" नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ एज्युसिटी निर्माण होत असून यामध्ये पाच परदेशी विद्यापीठे एकत्र येत आहेत. यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात शिकविले जाणारे अभ्यासक्रम भारतातच शिकायला मिळणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांना देश सोडण्याची आणि कमी आर्थिक खर्चात परदेशी विद्यापीठात शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. भारतीय विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी जाण्याची गरज राहणार नाही कारण आज राज्य शासनाने राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत पाच परदेशी विद्यापीठांसोबत आशयपत्र नुकतेच प्रदान केले आहे.

परदेशी विद्यापीठाचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान

१. University of Aberdeen (स्कॉटलंड) भारतामध्ये कॅम्पस स्थापन करणारे पहिले स्कॉटिश विद्यापीठ. जागतिक समस्यांवर उपाय शोधणाऱ्या अभ्यासक्रमांवर विशेष भर.

२. University of Western Australia (G o 8) STEM, व्यवसाय आणि संशोधन क्षेत्रातील अभ्यासक्रम. भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक कार्यबलासाठी सक्षम करणे हे मुख्य उद्दिष्ट.

३. University of York (UK - Russell G r o u p) एआय, सायबर सुरक्षा, बिझनेस आणि क्रिएटिव्ह इंडस्ट्रीजसाठी विशेष अभ्यासक्रम. जागतिक उद्योगांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम डिझाइन.

४. Illinois Institute of Technology (U S A) इंजिनीअरिंग, संगणक विज्ञान आणि बिझनेस क्षेत्रात अग्रगण्य. E l e v a t e प्रोग्रामच्या माध्यमातून संशोधन, इंटर्नशिप आणि रिअल-वर्ल्ड अनुभव.

५. Istituto Europeo di Design (IED - इटली) फॅशन, प्रॉडक्ट डिझाईन आणि व्हिज्युअल कम्युनिकेशन क्षेत्रात कौशल्याधारित, क्रिएटिव्ह शिक्षण देणारी प्रतिष्ठित संस्था.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ५ विद्यापीठ उभी राहणार आहेत. याच परिसरात येत्या काही वर्षात मेडिसिटी, स्पोर्टस सिटी आणि इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे. आगामी कालावधीत दहा विद्यापीठे एकत्र येतील अशी संकल्पना राबविण्यात येणार आहे. सध्या या पाच विद्यापीठांमुळे हा परिसर पूर्ण शिक्षण आणि संशोधनासाठी ओळखला जाईल. मुंबईची सध्या वित्तीय, औद्योगिक आणि मनोरंजन उद्योगाचे शहर म्हणून ओळख आहे, आता शैक्षणिक शहर अशीही ओळख होईल. 'विकसित भारत २०४७' मध्ये ही बाब महत्त्वाची भूमिका बजावेल.

**अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये**

जागतिक दर्जाच्या पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश

परदेशातील शिकवणी आणि अभ्यासक्रम भारतातच उपलब्ध होणार

भविष्यात आणखी पाच विद्यापीठांचा समावेश होणार

**विद्यार्थ्यांसाठी फायदे**

जागतिक पातळीवरील शिक्षणाचा अनुभव - विद्यार्थ्यांना विविध देशांतील विद्यार्थ्यांसोबत शिकण्याची संधी उपलब्ध होणार

कमी खर्चात आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे शिक्षण उपलब्ध होणार

नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित होत आहे. अटल सेतू कार्यरत आहे. पायाभूत सुविधांच्या व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटी यामुळे एज्युकेशनल हब निगडित सर्वांना उपयुक्त ठरेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशातील अनेक विद्यापीठांना भारतात येण्यासाठी उत्सुकता दाखवली आहे. ज्या भारतीय तरुणांना परदेशी जाऊन शिक्षण घेणं शक्य नाही त्यांचे स्वप्न आता अपुरे राहणार नाही. हा प्रकल्प नवी मुंबई व मुंबईला जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देईल आणि महाराष्ट्र राज्याचे एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट व भारताचे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे आर्थिक लक्ष्य २०२९ पर्यंत साध्य करण्यासाठी एक महत्त्वाचा घटक ठरेल. भारतीय विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाचे शिक्षण, देशातच विद्यार्थ्यांना आता जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम, संशोधन संधी आणि अनुभव हे परदेशी न जाता देशातच उपलब्ध होतील. हे शिक्षण केवळ परदेशी अभ्यासक्रमांची प्रतिकृती न राहता, भारतातील स्थानिक गरजांशी सुसंगत व रोजगारक्षम असेल. हे अभ्यासक्रम स्थानिक औद्योगिक गरजांनुसार अनुकूल केले जातील. संशोधन, स्टार्टअप्स आणि उद्योग सहकार्याला चालना मिळेल. विद्यार्थ्यांना एक्स्चेंज प्रोग्राम्स, सेमिस्टर ट्रान्सफर, ग्लोबल इंटर्नशिप्स यांसारख्या संधी उपलब्ध होतील. प्राध्यापक व संशोधक यांचाही आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग वाढेल.

पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना नवी मुंबईत शैक्षणिक संकुल स्थापन करण्यासाठी आशयपत्र (L O I) प्रदान करण्यासाठी विद्यापीठ अनुदान योजना (UGC) अधिकृत मान्यता मिळाली आहे. यामुळे नवी मुंबई हे जागतिक दर्जाचे शिक्षण व नवोन्मेषाचे केंद्र बनणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना, भारताच्या उच्चशिक्षणात एतिहासिक बदल, गुणवत्ताधारित शिक्षण व संशोधनाला प्रत्सोहन, मुंबई / नवी मुंबईचा जागतिक शैक्षणिक नकाशावर ठसा आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP) अंतर्गत परदेशी विद्यापीठांचे भारतात आगमन यामुळे साध्य होणार आहे. परदेशी विद्यापीठ भारतात सुरू होणे म्हणजे 'वसुधैव कुटुंबकम्'चा शैक्षणिक अ◌ाविष्कार आहे आणि म्हणूनच महाराष्ट्राची ही वाटचाल केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून, ती नव्या भारताच्या ज्ञानाधिष्ठित विकासाची दिशा दर्शवणारी आहे. येत्या काही वर्षांत मुंबई / नवी मुंबई ज्ञाननगरी म्हणून जागतिक नकाशावर नवी ओळख होईल हे नक्की!

# वास्तव .... शाळा आणि मंदिर

देवाचा दरवाजा चांदीने मढला!
शाळेचा दरवाजा पाण्याने सडला!!
मंदीरातील झुंबराला हिऱ्या-मोत्यांचे खडे !
शाळेच्या भिंतींना पडु लागलेत तडे !!
मंदीरात जाऊन लोक पोथी पुराण वाचतात !
शाळेच्या ग्रंथालयात उंदीर मामा नाचतात !!
मंदीराच्या दानपेटीत गुप्तदान करतात !
शाळेच्या देणगीची पावतीच मागतात !!
दरवर्षाला देवाची भरवतात यात्रा !
पालक मेळाव्यात पालक फक्त सतरा !!

पुजाऱ्यांच्या गळ्यात सोन्या-चांदीचे हार !
कंत्राटी शिक्षकांची होऊ लागली उपासमार !!
न खाणाऱ्या देवाला पंचपक्वानांचा घास !
शाळेत खिचडी भाताचा अहो येईना वास !!
आता तुम्हीच सांगा कधी संपेल इथला अंधविश्वास !
शिकले-सवरलेले तरुण- तरुणीच करु लागले आता उपवास !!

**संकलन**
**संतोष मोहिते**
**नाशिक**

# शिक्षणप्रेमी समीर सय्यद यांच्याकडून टाकळी शाळेस अनोखी भेट

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------




अकोले येथील सामाजिक कार्यकर्ते व स्टार मोबाईल शा◌ॅपीचे संचालक समीर सय्यद यांनी शाळा प्रवेशोत्सव दिनाचे औचित्य साधून त्यांच्या वाढदिवसानिमित्त टाकळी जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या व लेखन साहित्याचे वाटप केले. त्यांच्या या दातृत्वशील स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. समीर सय्यद व त्यांचा मित्र परिवार नेहमीच सामाजिक व शैक्षणिक सेवाभावी उपक्रमांमध्ये योगदान देत असतो. संवेदनशीलता जपून सय्यद परिवाराने राबविलेल्या नवोपक्रमासाठी अकोले तालुका गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, देवठाण बीट शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड, टाकळी केंद्र प्रमुख रोहिणी खतोडे, केंद्र मुख्याध्यापक डॉ.श्रीनिवास पोतदार, सहशिक्षिक संजय देशमुख, दत्तात्रय देवगिरे, संजय शिंदे, निता लेंभे यांनी सय्यद परिवाराचे अभिनंदन केले आहे. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी टाकळी केंद्रातील उपक्रमशील तंत्रस्नेही शिक्षक समशिर शेख यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने टाकळी गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, पालक, तरूण मित्र मंडळ व ग्रामस्थ उपस्थित होते.

# भालचंद्र तिडके साहेब व अमर केंद्रे यांचा निरोप समारंभ साजरा

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------------



मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील पोलिस स्टेशन चे API श्री भालचंद्र तिडके साहेब व PSI अमर केंद्रे साहेब यांचा निरोप समारंभ दि.१७ रोजी ठिक ५.०० वा.मोठ्या उत्साहात पोलिस स्टेशन च्या प्रांगणात साजरा झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ नागरिक सुभाष आप्पा बोधने होते तर सत्कार मुर्ती भालचंद्र तिडके साहेब व अमर केंद्रे साहेब आणि नव्याने रुजू झालेले API राजेश चव्हाण यांचे यथोचित सत्कार करण्यात आले या निरोप समारंभ साठी परीसरातील सर्व पत्रकार बांधव, गावातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, पोलिस पाटील, सरपंच, उपसरपंच, ग्राम पंचायत सदस्य, पोलिस मित्र, राजकीय कार्यकर्ते, व पदाधिकारी आणि साहेबावर प्रेम करणारे ईतर सर्व मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. २८ महिन्याच्या कार्यकाळाचा साहेबांना उत्कृष्ट अस कामाची पावती उपस्थित जनसमुदाया कडुन मिळाली.तिडके साहेब मुक्रमाबाद पोलिस स्टेशनचा पदभार स्वीकारल्यानंतर नंतर गुन्हेगारी चे प्रमाण कमी केले.चोरांचे प्रमाण कमी केले.पोलीस स्टेशन मुक्रमाबाद येथे कर्मचार्यांची संख्या कमी असताना देखील मुक्रमाबाद पोलिस स्टेशन चे नाव जिल्ह्यात साहेबांनी गाजवीले गावात ठिक ठिकाणी सी.सी.टीव्ही फोटेज भसविले,पोलीस स्टेशन ला नंदनवन चे रुप आणले.पक्ष्यांना पीण्यासाठी पाण्याची सोय.ईतर कला कौशल्य त्यांनी येथील पोलिस स्टेशनला प्रधान केले.प्रत्येक गावातील नागरिक पुष्पांनी आणि शब्दाने साहेबांचा उत्कृष्ट असा कौतुकास्पदच वर्षाव झाला. ईतक्या मोठ्या टेबलावर सुद्धा शाल श्रीफळ हार व पुष्पगुच्छ ठेवायला जागा सुद्धा उतरला नव्हता ईतका शुभेच्छांचा वर्षाव झाला. सरांना जड अंतःकरणाने डोळ्यात पाणी येऊ लागला होता. एवढा मोठा सत्कार व चाहात्यांचा प्रेम पहिल्यांदाच मुक्रमाबाद पोलिस स्टेशन चे API भालचंद्र तिडके साहेबांचं निरोप समारंभ संपन्न झाला.दुसरे सत्कार मुर्ती PSI अमर केंद्रे साहेब यांना पण निरोप देऊन त्यांचे यथोचित सन्मान करण्यात आला याच दिवशी योगायोग अमर केंद्रे साहेब यांचा जन्मदिवस होता त्यांचं वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला. व त्यांनाही निरोप देऊन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.नवीनच रुजु झालेले राजेश चव्हाण साहेबांच पण सर्वांनी स्वागत करुन त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी उपसरपंच सदाशिव बोयेवार, तंटामुक्ती अध्यक्ष गौसखा पठाण, माणिक दादा गायकवाड, संजय गायकवाड,बालाजी पाटील सांगवीकर, संतोष हेसे, विनोद आपटे, बालाजी पसरगे या प्रमुख वक्त्यांची भाषणं झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी पसरगे यांनी केले तर बिट जमादार शिवाजी आडेकर यांनी आभार मानले.

# खान्देश शाहीर हरिभाऊ पाटील यांच्या जयंतीदिनी दि. २१ रोजी 'पालकत्व निभावतांना' या विषयावर सतीश पाटील यांचे व्याख्यान

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



स्वातंत्र्य सैनिक शाहीर हरिभाऊ पाटील यांच्या जयंती निमित्ताने 'पालकत्व निभावतांना' हा समाज प्रबोधनाचा कार्यक्रम दिनांक २१ जून रोजी शनिवारी दुपारी चार वाजता शाहीर हरिभाऊ पाटील मराठा मंगल कार्यालय, ज्ञानदीप सोसायटी नंदुरबार येथे आयोजित केला आहे. समाज प्रबोधनपर उपक्रमासाठी पुणे येथील सुप्रसिद्ध वक्ते सतीश पाटील यांचे 'पालकत्व निभावताना' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या मार्गदर्शनात बदलत्या काळात स्पर्धात्मक युगात आपले अपत्य घडवताना पालक म्हणून आपली भूमिका कशी असावी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या प्रसंगी अध्यक्षस्थानी डॉ.गुलाबराव मराठे, माजी जिल्हा शल्यचिकित्सक व अध्यक्ष स्वातंत्र्यसैनिक शाहीर हरिभाऊ पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नंदुरबार यांची उपस्थिती लाभणार आहे. तरी सर्व पालक व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला हजर राहावे अशी विनंती मराठा पाटील समाजसेवा मंडळ नंदुरबार अध्यक्ष प्राचार्य दादासाहेब बी.एस. पाटील, सचिव नानासाहेब यशवंतराव. दे. पाटील तसेच स्वा.सै. शाहीर हरिभाऊ पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी यांनी केली आहे.

# धुळे महापालिकेने दैनिक स्वराज्यदूत च्या बातमीची घेतली दखल

## भर पावसात भल्या सकाळी पालिकेचे 'भले' काम

## परीसरातील नागरिकांनी स्वराज्यदूत दैनिकाचे केले कौतुक

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

**आज सकायमा देखं,**
**व्हता सैनधार पानी...**
**तरी वचन निभावं,**
**धुये महापालिकानी...**
**तीनी धावपय देखी,**
**जोडा मनफाई हात...**
**तेले तुकोबाबी म्हणे,**
**हाई महात्मानी जात...**




धुळे शहराची नालेसफाईची टक्केवारी ९५%
श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत




नालेसफाईची ९५ टक्केवारी' या शिर्षकाखाली काल दिनांक १९ जून २०२५ रोजीच्या "दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्र" व समाजमाध्यमांवर साक्री रोड, विद्यावर्धिनी लगतच्या नाल्याच्या दुर्दशेबद्दल एक वृत्त प्रसिद्ध केले होते. आज भल्या सकाळी फिरुन येत असतांना भर पाऊसात आरोग्य विभागाचे कर्मचारी बांधव भलं काम करतांना दिसले. या भल्या सकाळच्या पडत्या पाऊसातील भल्या कामाबद्दल मी भेटून त्यांचे आभार मानले. भले भविष्यात कामात सातत्य होवो ना होवो परंतु आज जे भलं काम केले त्याबद्दल पालिकेचे नक्कीच भले होईल असे परिसरातील नागरीक नक्कीच शुभ चिंतीतील अशी माझी खात्री आहे. वृत्तपत्र समाजमाध्यमात झालेल्या वृत्ताची शिघ्रतेने दखल घेतल्याबद्दल महापालिकेचे उपायुक्त हेमंत निकम साहेब, तक्रारीची कायम 'नोटेड' म्हणून दखल घेणारे नगरसचिव मनोज वाघ, मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे, स्वच्छता निरीक्षक लक्ष्मण पाटील, आमच्या परिसरातील नेहमीच तत्परतेने कार्यरत असलेले स्वच्छता निरीक्षक संदीप मोरे, प्रत्यक्ष स्पॉटवर काम करणारे स्वच्छता कर्मचारी छोटू पवार, जावेद बेग, रियाज शेख, प्रणिल मोकळे, विनोद कंडारे या भल्या माणसांचे भरभरून भले होवो व भविष्यातही ते अशा कामांबद्दल तत्परता दाखवतील यासाठी 'जरतारी' शुभेच्छा !

# वंचित युवा च्या दणक्याने रस्त्याच्या कामाचे प्रस्ताव तयार डफली बजाव आंदोलन तात्पुरते स्थगित

पल्लवी शेलार
श्रिगोंदा तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------




सोमवार दि १६ जुन ०२५ रोजी डपली बजाव आंदोलन तात्पुरते स्थगित करत आंदोलनाची पुढील दिशा बाबत गटविकास अधिकारी जगताप साहेब यांना निवेदन देताना वंचित युवा चे जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भैलुमे यांच्या सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते

सोमवार दिनांक १६ जून ०२५ रोजी मौजे कोळवडी अहिल्यानगर दलित वस्ती आणि शाहूनगर दलित वस्ती तसेच नांदगाव येथील हाडवळा वस्ती दलित वस्ती व हाडोळावस्तीचे नामकरण करणे बाबत व रस्त्याच्या कामाबाबत वंचित बहुजन युवा आघाडी वतीने वंचित बहुजन आघाडी प्रदेश प्रवक्ता अँड अरुण आबा जाधव आणि वंचित बहुजन आघाडीचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष योगेशभाऊ साठे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तसेच वंचित बहुजन युवा आघाडी अहिल्यानगर दक्षिण विभाग जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलुमे यांच्या नेतृत्वाखाली कर्जत येथील पंचायत समिती दालनात मागच्या आठ दिवसात गटविकास अधिकारी जगताप साहेब यांना डफली बजाओ आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता, यानुसार आंदोलन सुरू करण्या अगोदरच गटविकास अधिकारी जगताप साहेब यांनी आंदोलकांची वेळीच दक्षता घेत सदर कामाचा प्रस्ताव आम्ही तयार केलेला आहे सध्या आम्हाला काही दिवस काम सुरू करण्यासाठी वेळ देण्यात यावा अशी आंदोलन आणि अधिकारी यांच्यामध्ये साधक बाधक पॉझिटिव्ह चर्चा झाल्यानंतर संबंधित सर्व उपस्थितीत कर्मचाऱ्यांसह त्यांनी याबाबत विनवणी केल्या नंतर , तसेच सध्या कसल्याही परिस्थितीमध्ये आम्ही रस्त्याचे काम सुरू करत आहोत ओढ्यामध्ये सिमेंट पाईप टाकून उर्वरित ठिकाणी मुरूम टाकण्याचे काम उद्यापासून सुरू करत आहोत असे लेखी आश्वासन देत सदरील रस्त्याच्या कामाबाबत, प्रस्तावाबाबत लेखी दिल्यानंतर, तसेच आंदोलनाच्या बाबत आंदोलन तात्पुरते थांबवत आहोत असे वरिष्ठ नेते अँड अरुणआबा जाधव, योगेशभाऊ साठे यांना याबाबत कळविल्यानंतर आंदोलन आम्ही तात्पुरते स्तगीत केले आहे असे वंचित बहुजन युवा आघाडी जिल्हाध्यक्ष सोमनाथभाऊ भैलुमे यांनी तसे निवेदन देऊन आंदोलन तात्पुरते स्थगित करत असल्याचे जाहीर केले.

शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना निवळ त्रास देण्यासाठी वंचित बहुजन आघाडी चे आंदोलन कधीही नसते कामाच्या बाबत संबंधित सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना विश्वासात घेऊन सर्वसामान्य नागरिकांची कामे झाली पाहिजेत असा आमचा उद्देश असतो आणि तो आम्ही वेगवेगळ्या आंदोलनाच्या स्वरूपामधून ती कामे साध्य करण्याचा प्रयत्न करत असतो , सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचा आमचा नेहमी मोठा प्रयत्न असतो आणि तो आम्ही सतत पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. आमचा न्याय हक्क मागताना एखाद्या अधिकाऱ्याला रुचत असेल अशा कोणत्याही अधिकारी कर्मचाऱ्री यांची गय केली जाणार नाही. ओबीसी एससी एसटी गरीब मराठा कष्टकरी शेतकरी शेतमजूर जनतेच्या न्याय हक्कासाठी वंचित बहुजन आघाडी सदैव लढणार असल्याचे प्रतिपादन वंचित युवाचे जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भैलुमे यांनी केले.

यावेळी जिल्हा महासचिव संजय शेलार तसेच तुकाराम पवार जिल्हा उपाध्यक्ष लखन पारसे, जिल्हा उपाध्यक्ष दीपक ससाने, जिल्हा उपाध्यक्ष सचिन गायकवाड, जिल्हा सल्लागार भाऊसाहेब जावळे, तालुका उपाध्यक्ष तात्यासाहेब चव्हाण, तालुका संघटक रवी सोनवणे, दत्ता शेलार, आमचे मार्गदर्शक सल्लागार ज्येष्ठ नेते भारत आण्णा साळवे, बाबासाहेब घोडके तालुका महासचिव अविनाश काळे, दिसेना पवार, समाजसेवक हरिण पोटरे शहराध्यक्ष विकास समुद्र, बौद्धाचार्य गोदड समुद्र, शरद चव्हाण,भरत चिंदे यांच्यासह कर्जत तालुक्यातील अनेक पदाधिकारी भीमसैनिक कार्यकर्ते उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडी कर्जत तालुका अध्यक्ष पोपट शेटे, वंचित बहुजन युवा आघाडी कर्जत तालुका अध्यक्ष दत्ता भालेराव आंदोलनाचे निमंत्रक होते. मौजे नांदगाव आणि मौजे कोळवडी शिवारातील संबंधित वरील दलित वस्ती मधील नागरिकांना येण्या जाण्यासाठी पावसाळ्यामध्ये रस्त्याची दुरावस्था निर्माण झाली आहे, गेली पन्नास वर्षात आज तागायत त्या रस्त्यावर साधा मुरूम देखील शासनाचा पडलेला नाही पाऊस पडल्यानंतर तो रस्ता अगदी येण्या जाण्यास अयोग्य होतो अशा परिस्थितीमध्ये नागरिकांना अनेक त्रास सहन करून कसरती करत चिखलातून यावे जावे लागत आहे, सदर कामाबाबत कर्जत पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी तसेच अधिकारी यांनी टाळाटाळ केल्यास पुढील आठ दिवसात तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे यावेळी गट विकास अधिकारी जगताप साहेब यांना लेखी निवेदन देऊन सध्याचे तात्पुरते आंदोलन स्थगित केले.

# 21 जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठया प्रमाणात साजरा करा : जिल्हाधिकारी कर्डिले

## 11 वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यासाठी योग संगम या लिंकवर नोंदणी करण्याचे आवाहन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------------

दरवर्षी २१ जून रोजी जगभरात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहाने साजरा करण्यात येतो. यावर्षीच्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना ही 'एक पृथ्वी एक आरोग्य' साठी योग (Yoga for One Earth One Health) ही असून केंद्र शासनाने योगदिनाचा कार्यक्रम सर्व स्तरांवर मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे निर्देश दिले आहेत. योगशास्त्र ही भारतीयांची जगाला दिलेली देणगी आहे. योगाने उच्च रक्तदाब, मधुमेह, थायरॉईड वृद्धी, मनोविकार, सांध्यांचे विकार तसेच दैनंदिन जीवनशैलीमुळे निर्माण झालेले आजार कमी होऊ शकतात. दैनंदिन जीवनात योग आत्मसात केल्याने शरीर निरोगी राहण्यास मदत होते तसेच सकारात्मक ऊर्जा कायम राहते.

यास अनुसरून जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय संस्थांमध्ये सर्व जिल्हा परिषद शाळा, सर्व खाजगी व अनुदानित शाळांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात यावा. यासाठी शासकीय-अशासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी, इतर विभागातील अधिकारी-कर्मचारी व सामान्य नागरिक यांचा सक्रिय सहभाग घ्यावा व योगविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी सोबत दिलेल्या उपक्रमांचा अंतर्भाव करून त्यासंबंधीचा प्रचार करण्यासाठी विविध ऑनलाइन संसाधनांचा वापर करावा. यातील “योग संगम” या २१ जून २०२५ रोजीच्या योगसत्र कार्यक्रमाची नोंद (रजिस्ट्रेशन) केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या अधिकृत पोर्टल https://yoga.ayush.gov.in/yoga-sangam वर तात्काळ रजिस्ट्रेशन करुन सदरचा स्क्रिनशॉट संबंधित व्हॉटसअॅप ग्रुपवर टाकण्यात यावेत. दिनांक २१ जून रोजी सकाळी ७ ते ७.४५ वाजे दरम्यान कॉमन योग प्रोटोकॉल (CYP) नुसार योग प्रात्यक्षिके करावीत व पुढील १५ मिनिटे इतर योगाभ्यास करावा.

CYP लिंक
https://www.youtube.com/watch?v=X८zQmuWEpSU&list=PLxZ०५kgQiFwf६JbbEvThly९AcZ०xrfxvk&index=३ कार्यक्रमात योग संबंधित माहिती साहित्य, बॅनर्स, कटआउटस इत्यादीचा योग्य वापर करावा. कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरा करून त्यास समाज माध्यमे व वृत्तपत्रांतून प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच फोटो, बातम्यांचे संकलन व संख्या अहवाल दिलेल्या प्रपत्राप्रमाणे भरून https://yoga.ayush.gov.in/yoga-sangam या पोर्टलवर पाठवावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित कार्यालयांना दिले आहेत.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# महाराष्ट्र राज्यस्तरीय पर्यावरण समितीच्या सदस्यपदी आण्णासाहेब जगताप यांची निवड

पल्लवी शेलार
श्रीगोंदा तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------



राजगुरूनगर येथे हिरवाई पर्यावरण समितीच्या राज्यस्तरीय वार्षिक बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनंतर सर्वानुमते राज्यस्तरीय पर्यावरण समितीच्या सदस्यपदी श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर येथील धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरण प्रेमी आण्णासाहेब ज्ञानदेव जगताप यांची निवड करण्यात आली. राजगुरूनगर येथे झालेल्या बैठकीत पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी हिरवाई पर्यावरण समिती आणि पर्यावरण समितीचे अध्यक्ष विजयकुमार जेठे यांच्या अध्यक्षतेखाली आणि जेष्ठ मार्गदर्शक पांडुरंग चौघुले (सोलापूर) यांच्या उपस्थितीत विविध उपक्रम हाती घेण्याबाबत सर्वानुमते चर्चा करण्यात आली. त्यात आझाद मैदान मुंबई येथे झालेले धरणे आंदोलन, महाराष्ट्र राज्यातील सर्व स्टोन क्रेशरमुळे प्रदुषणात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने त्यावरून सर्व स्टोन क्रेशरची वास्तविकता तपासणी त्यावर संबंधित प्रशासनाला जाब विचारण्यासाठी, विविध मोर्चे, आंदोलन निश्चित करणे, याबाबत न्यायालयीन प्रक्रिया सुरू करणे, तसेच नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करणे व विविध ठिकाणी वृक्षलागवड करणे याविषयी सखोल चर्चा करण्यात आली. त्यानुसार सर्वांनी वरील विषयांना मंजुरी घेऊन सभा पार पडली. या बैठकीस विजयकुमार जेठे, पांडुरंग चौघुले (सोलापूर) संजय गायकवाड नाशिक (पर्यावरण समिती उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख) शांताराम भोसले (सातारा) माधव सरतापे (छत्रपती संभाजीनगर) आण्णासाहेब जगताप (श्रीगोंदा) संभाजी कापसे (नेवासा) सत्यवान शिंदे (पुणे) इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. आण्णासाहेब जगताप यांच्या निवडीचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते साजन भैय्या पाचपुते महाराष्ट्र राज्य पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे जिल्हा शिक्षक बॅंकेचे माजी चेअरमन अविनाश निंभोरे सर बाळासाहेब साळुंके गुरुजी संजय रायकर सर रमेश कळमकर शरद खोमणे डॉ. उमेश हांडे डॉ. चंद्रशेखर कळमकर यांनी अभिनंदन केले.

# भाजपात फुट, शिंदे सेना आणि काँग्रेसची फुस! आपल्याच पक्षाच्या नगराध्यक्षा सौ.जयश्री पवारांविरुध्द 'अविश्वास'!

## सौ.जयश्रींचा पराजय नक्की, सौ.उषा पवारांना संधी 25 ला सर्वसाधारण सभा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------




धुळे: साक्रीच्या राजकारणात इतिहास घडवत भाजपाने नगरपंचायतीत बहुमताने सत्ता मिळविली. मात्र ही सत्ता टिकविण्याच्या नादात नगरपंचायतीतील भाजपात फुट पडली आहे. मनमानी पध्दतीने नगराध्यक्षा काम करीत असल्याचा आरोप खुद्द भाजपाने केला आहे. विशेष म्हणजे भाजपाने ज्यांची तीन दक्षकांची सत्ता उलथवून लावली होती ते साक्रीच्या राजकारणातील किंग मेकरच्या भूमीकेत सदैव राहिलेल्या नानासाहेब नागरे यांची साथ आता भाजपाला मिळाली आहे. शिंदे सेना आणि काँग्रेसच्या एका सदस्याच्या मदतीने उपनगराध्यक्ष तथा भाजपाचे गटनेते बापूसाहेब गिते यांनी नगराध्यक्षा सौ.जयश्री हेमंत पवार यांच्याविरुध्द अविश्वास प्रस्ताव आणला आहे. या प्रस्तावामध्ये महत्वाच्या भुमीकेत नगरपंचायतीचे विरोधी पक्षनेते पंकज मराठे आणि सुमित नागरे हे आहेत. त्यामुळे नगराध्यक्षा सौ.जयश्रींचा पराजय निश्चित मानला जात आहे. साक्रीच्या राजकारणात भाजपामध्येच दोन छुपे गट आहेत, दहिते बापू आणि सुरेशआबा पाटील यांच्यातील सख्य साक्रीकरांना माहित आहे. साक्री नगरपंचायतीमध्ये भाजपाची सत्ता आल्यानंतर पहिले अडीच वर्ष दहितेबापू समर्थक यांना नगराध्यक्षपद देण्याचे ठरले.त्यानंतरचे अडीच वर्ष सुरेश रामराव पाटील यांच्या समर्थकांना हे पद दिले जाईल असे सांगितले गेले होते. परंतु अडीच वर्षाचा काळ उलटून देखील दहिते समर्थक नगराध्यक्षा सत्तेची खुर्ची सोडायला तयार नसल्याने सुरेशआबा समर्थक नगरसेवकांनी शिंदे सेनेच्या आमदार सौ.मंजुळा गावीत आणि नानासाहेब नागरे यांच्याशी संपर्क करत त्यांच्या मदतीने नगरपंचायत काबीज करण्याचा मनसुबा रचला. त्यानुसार सुत्रे हलविण्यात आली.

भाजपाचे गटनेते तथा उपनगराध्यक्ष बापुसाहेब गिते, विरोधी पक्षनेते पंकज मराठे यांच्यासह भाजपाचे ६, शिंदे सेनेचे ५ आणि काँग्रेसचे १ अशा एकुण १२ नगरसेवकांनी अविश्वासाचा हा प्रस्ताव जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्याकडे काल दि.१८ जून रोजी सादर केला. तसेच कलम ५५ अंतर्गत विशेष सभा बोलविण्याची विनंती केली. त्यानुसार दि.२५ जुन रोजी सकाळी ११ वाजता सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

नगरपंचायतीच्या कामकाजात सातत्याने अनियमितता होत असल्याचा आरोप करीत नगरसेवकांनी आपल्या प्रस्तावात म्हटले आहे की, नगराध्यक्षा जयश्री पवार या नगरसेवकांच्या सुचना न स्विकारता स्वतःच्या मर्जीप्रमाणे मनमानीपणे वाटेल तेव्हा बैठक बोलवितात. नगरसेवकांनी सुचविलेले विषय विषयपत्रिकेत टाकत नाहीत. विकासकामांची देयक मंजुर करण्यास टाळाटाळ करणे व देयके वेळोवेळी न देणे. मार्च २०२४ नंतर सहा महिन्यात एकही सर्व साधारण सभा न घेणे, नगरोत्थान व दलितेत्तर विकास निधीचा अपव्यय करणे. प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्याची मागणी केल्यानंतर नगरसेवकांना नगरपंचायतीचे कामकाज करतांना विश्वासात न घेणे, शासनाच्या नियमांचे पालन न करणे, वित्तीय व प्रशासकीय नियंत्रणात ढिसाळपणा, त्यामुळे नगरपंचातीच्या उत्पन्न वाढीबाबत प्रगती होत नाही. केंद्र व राज्य शासनाच्या योजना राबविण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यास व आलेल्या योजना राबविण्यासाठी जाणीवपूर्वक टाळाटाळ करणे आदी बाबींचा विचार केला असता नगराध्यक्षा जयश्री पवार यांनी नगरसेवकांचा विश्वास गमावलेला असून त्या नगराध्यक्षपदी राहण्यास पात्र नाहीत, असे सदस्यांचे मत झाले आहे. त्यामुळे नगराध्यांविरुध्द महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम ५५ अन्वये नियम कालावधीत नगरपंचायतीची विशेष सभा बोलविण्यात यावी व नगराध्यक्षांविरुध्द अविश्वास प्रस्ताव संमत

**जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अजेंडा प्राप्त**

“साक्री नगरपंचायतीच्या नगराध्यक्षाबद्दल दि.२५ जुन रोजी सकाळी ११ वाजता अविश्वास असल्याबाबचा अजेंडा आम्हाला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाला आहे. त्यानुसार आम्ही जे जे सभेला उपस्थित राहतील, त्यांना नोटीस बजावत असल्याची माहिती साक्रीचे नगरपंचायतीचे मुख्याधिकारी देवेंद्रसिंग परदेशी यांनी दिली”

करुन त्यांना पदमुक्त करावे, अशी मागणी १२ नगरसेवकांनी केली आहे.

अविश्वास प्रस्ताव दाखल करणार्यांमध्ये उपनगराध्यक्ष तथा भाजपाचे गटनेते, नगरसेवक बापुसाहेब गीते, महिला व बालकल्याण सभापती संगिता भावसार, उपसभापती नर्गिसबी पठाण, स्वच्छता व आरोग्य समिती सभापती प्रविण निकुंभे, विरोधी पक्षनेते पंकज मराठे नगरसेवक अॅड. गजेंद्र भोसले, कल्पना खैरनार, सोनल सुमित नागरे, सुमित ज्ञानेश्वर नागरे, रेखा सोनवणे, उषाबाई पवार, व राहुल अरविंद भोसले या नगरसेवकांचा समावेश आहे.

दरम्यान

नगराध्यक्षा जयश्री पवार यांच्या मनमानी कारभाराबाबत पत्रकारांना बोलतांना उपनगराध्यक्ष तथा गटनेते बापूसाहेब गिते म्हणाले की, अडीच वर्षाचा कार्यकाळ पुर्ण झाल्याने नगराध्यक्षा पवार यांनी यांनी पदाचा राजीनामा द्यायला पाहिजे होता. तसेच त्या कुठल्याही गोष्टी गांर्भीयाने घेत नव्हत्या. सन २०१४ मध्ये केवळ तीन बैठका घेण्यात आल्या. चालु वर्षात देखील केवळ २३ फेब्रुवारी रोजी एकच बैठक घेतली. त्यामुळे नगरसेवकांनी जिल्हाधिकार्यांकडे बैठक घेण्याबाबत मागणी केली. ती १३ मे रोजी घेण्यात आली. त्यात स्वतः जिल्हाधिकार्यांनी सभेचा अजेंडा काढला. त्यात सर्व १७ नगरसेवकांनी ठराव मंजुर केले. त्यानंतर

**उषाबाई पवार यांना संधी**

“दरम्यान पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यां तथा वार्ड क्र. ३ च्या नगरसेविका उषाबाई अनिल पवार यांना आता नगराध्यक्षपदाची संधी देणार असल्याची चर्चा आहे.”

जुन महिना उलटून देखील नगराध्यक्षा जयश्री पवार यांनी विकास कामांच्या ठरावांवर स्वाक्षर्या केलेल्या नाहीत. आ. अमरिशभाई पटेल यांनी सप्टेंबर २०२४ मध्ये साक्रीत महिला व पुरूष स्वच्छतागृहांसाठी निधी दिला होता. मात्र नगराध्यक्षा पवार यांनी आजपर्यंत या कामाची वर्कऑर्डर देखील काढलेली नाही. नगराध्यक्षा पवार हा विकास कामांना सहकार्य करत नाही, वरिष्ठ नेत्यांचे देखील ऐकत नाही. त्यामुळे भाजपा व शिंदे गटाच्या एकुण १२ नगरसेवकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# जलजिवन मिशनमधील भ्रष्टाचारावर आवाज

## मा.खासदार श्री. गोवाल पाडवी यांची भेट घेऊन मा. कैलास मोरे यांनी केली सखोल चर्चा

प्रवीण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
---------------------

नंदुरबार लोकसभा मतदारसंघाचे मा. खासदार श्री. गोवाल पाडवी यांच्या नंदुरबार येथील निवासस्थानी आज आर.पी.आय. (गवई गट) चे सचिव कैलास मोरे यांनी भेट घेऊन साक्री तालुक्यातील विविध समस्या तसेच जलजिवन मिशन योजनेतील भ्रष्टाचाराबाबत सविस्तर चर्चा केली.

या बैठकीत साक्री तालुक्यातील शेवडीपाडा परिसरातील जलजिवन मिशन योजनेत झालेल्या गैरव्यवहाराचा मुद्दा मुख्यत्वे उपस्थित करण्यात आला. श्री. मोरे यांनी सांगितले की, आदिवासी भागातील जुन्या सिंचन विहिरी दाखवून नवीन नोंदी तयार करण्यात आल्या असून, प्रत्यक्षात कामे झाली नसताना निधी खर्च झाल्याचे दाखवण्यात आले आहे. यासंदर्भात त्यांनी वेळोवेळी लेखी तक्रारी तसेच अमर उपोषण करून आवाज उठविला, मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही ठोस कारवाई केली नाही, असा आरोप त्यांनी केला.

पिंपळनेर वनविभागाकडूनही अनावश्यक खर्च करून प्रत्यक्षात कोणतेही ठोस काम न करता मोठ्या प्रमाणात निधीचा अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच, पंचायती समिती साक्री अंतर्गत मिळणाऱ्या घरकुल योजनेमध्येही आदिवासी लाभार्थ्यांसह इतर गरीब लाभार्थ्यांची लूट होत असून, संबंधित अभियंते व अधिकारी यांच्याकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण केलं जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

या सर्व बाबींविषयी चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई व्हावी, अशी मागणी कैलास मोरे यांनी केली. या चर्चेदरम्यान मा.खासदार गोवाल पाडवी यांनी सर्व मुद्दे गांभीर्याने ऐकून घेतले व यासंबंधी संबंधित खात्यांकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

# राजस्थानमध्ये ओबीसी बहुजन महासंघाचा गड!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
---------------------

राजस्थानच्या राजधानीत आज एक ऐतिहासिक घडामोड घडली! अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाच्या वतीने जयपूर येथे माजी मुख्यमंत्री यांच्या भेटीला एक शिष्टमंडळ पोहोचले. समाजाच्या हक्कांसाठी, सत्ताधाऱ्यांना जागं करण्यासाठी ही भेट ठरली निर्णायक!



या बैठकीत माजी खासदार आणि महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. खुशाल बोपचे, राष्ट्रीय उपाध्यक्ष गणेश पारधी (महाराष्ट्र), तसेच राजस्थान राज्याध्यक्ष हेमंत यादव यांनी स्पष्ट शब्दांत ओबीसी बहुजन समाजाच्या समस्या मांडल्या – शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय अधिकारांबाबत स्पष्ट भूमिका मांडत सरकारला जाब विचारला.

भविष्यात ओबीसी बहुजन महासंघ देशभरात एक प्रबळ ताकद बनून उभा राहील, हे या बैठकीतून स्पष्ट झाले. राजस्थानातील कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झालं असून, समाजहितासाठी आता झुंजेल तोच जिंकेल, अशी भावना यावेळी व्यक्त झाली.

**"ओबीसी समाजाला डावलणाऱ्यांना आता ठोकून उत्तर देण्याची वेळ आली आहे! डॉ. खुशाल बोपचे, राष्ट्रीय अध्यक्ष**

# इंजि. आनंद चंद्रिकापुरे यांचा भाजप प्रवेश शेकडो कार्यकर्त्यांचा कमळाकडे लवाजमा!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
--------------------

'सबका साथ, सबका विकास' या भाजपच्या मूलमंत्राने प्रेरित होत, 'माऊली फाउंडेशन' चे संस्थापक अध्यक्ष इंजि. आनंद चंद्रिकापुरे यांनी आज गोरेगाव येथे आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला!

पक्षप्रवेश समारंभाच्या वेळी बोलताना चंद्रिकापुरे म्हणाले, " भाजपने दिलेल्या संधीचे सोने करणार आहे. माझ्या नेतृत्वाखाली जनतेची सेवा आणि विकासाची नवी दिशा ठरवू!"





या समारंभाला भंडारा-गोंदिया समन्वयक विरेंद्र बाळा अंजनकर, भाजप जिल्हाध्यक्ष सीता रहांगडाले, माजी आमदार हेमंत पटले, खोमेश रहांगडाले, जिल्हा परिषद सभापती डॉ. लक्ष्मण भगत, पंचायत समिती सभापती चित्रकला चौधरी, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांची उपस्थिती लाभली.

यावेळी अमित भास्कर, प्रमोद लायकरे, प्रवीण गुंडाणे, संजय रहांगडाले, विजय बोरसरे, सुनील मेश्राम, अभय गौतम, दुलेश येडे, दुर्योधन पटले, जाकीर सय्यद, हरी सराटे, योगेश तुरकर, बेनीराम व छबिलाल भोंडे, केशोराव भोंडे, प्रशांत भोंडे, अविनाश भोंडे, अनिल राऊत, ओमप्रकाश जांभुळकर, सचिन खोब्रागडे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

# शिवसेना वर्धापन दिनाच्या औचित्यावर दहिवेल येथे भव्य रक्तदान शिबिर व विविध कार्यक्रमाचे आयोजन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------

दिनांक २२ वार रविवार रोजी दहिवेल येथे साक्री तालुक्याच्या आमदार सौ मंजुळा ताई गावित यांच्या उपस्थितीत व शिवसेना धुळे जिल्हा प्रमुख डॉ. तुळशीराम गावित यांच्या अध्यक्षतेखाली युवा सेना शिवसेना यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना वर्धापन दिनानिमित्त भव्य असे रक्तदान शिबिर व विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्य उज्ज्वल होण्यासाठी मोफत वहया वाटप, हातगाडी व्यवसायिकांना उन्हाळा, पावसाच्या संरक्षणासाठी छत्री वाटप, तसेच दहावी बारावी पहिल्या क्रमांकावर आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान, लाडक्या बहिणींसाठी ब्लड ग्रुप हिमोग्लोबिन चेकअप, तसेच समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल आमदार मंजुळाताई यांच्या हस्ते कॉमन मॅन यांचा सत्कार होणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजन मा. उपसरपंच व शिवसेना पिंपळनेर तालुका प्रमुख श्री अमोल भाऊ सोनवणे यांच्या मार्गदर्शक खाली होत आहे तरी या रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे असे आव्हान दहिवेल शिवसेना युवा सेना व सर्व पदाधिकारी यांच्याकडून करण्यात आले.


शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७


## विचार पुष्प

# विरह

भविष्यात नाहीचं आचं येऊ देणारं तुझ्या पदराला ।
ना प्रेमाचा डाव नवा मांडणार।
पडलो आता सरणावरती, गात्र गलीत झाले
तुझ्या भाळीच्या गोंदणावर हक्क कसा सांगणार।
सखे हक्क कसा सांगणार ॥
भेटशील का पुन्हा एकदा मजला नव्याने ।
आजही तुला भेटण्याचे शोधतो बहाणे ॥
नकोस काढू जुन्या आठवणी तुझ्या भाळीच्या गोंदणाच्या
मळवटावरील त्या तुझ्या नव्या कोऱ्या कुंकवाच्या ।
ओशाळल्या किती रात्री'
क्षण मधूर धुंद होते गंध मुक्याचे ।
तुझ्या आठवणीत रित्या गेल्या किती
पराती माझ्या रुखवताच्या, ।
माझ्या रुखवताच्या ॥
भेटशील का पुन्हा एकदा मजला नव्याने ।
आजही तुला भेटण्याचे शोधतो बहाणे ॥
बरसल्या आषाढधारेत सखे चिंब भिजून
पावसातही तू केसात गजरा माळे ।
तुझ्या आठवणींच्या हिंदोळ्यावर
आजही भिजत आहेत माझे उन्हाळे ।
कशी कुणा लागली दृष्ट पुणवला,
अंधारात न्हाली चांदणे ।
गतस्मृतीच्या हिंदोळ्याला कसे जपत असे लव्हाळे ॥
भेटशील का पुन्हा एकदा मजला नव्याने ।
आजही तुला भेटण्याचे शोधतो बहाणे
भेगाळल्या भूईला आणि उसवल्या नात्याला
आज भार आहे।
भाळीच्या कुंकवात तुला सारं आहे |
झाली तिरडी बांधुन ह्या मढ्याची, ।
लागली आस तुझ्या कोमल स्पर्शाची
शेवटची एकदा भेट मढ्याला, ।
तोच एक आधार आहे। तेवढाच
सरणाला आधार आहे ॥
भेटशील का पुन्हा एकदा मजला नव्याने ।
आजही तुला भेटण्याचे शोधतो बहाणे ॥

**कवी : गावगाडाकार**
**साहेबराव नंदन तात्या**
**ताहाराबादकर नाशिक**

# शरीर आणि मनाला संतुलित ठेवणारा योग

भारतीय प्राचीन परंपरा यामध्ये योगाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे कोरोनाच्या काळातील परिस्थिती असताना योग दिनाला योगाला फार महत्त्व होते योगा म्हणजेआत्ता तर काळाची गरजच झाली आहे आपल्या दैनंदिन जीवनात नियमित योगा करणे गरजेचे आहे सप्टेंबर २०१४ ला जागतिक योग दिवस म्हणून साजरा करावा ही मान्यता मिळाली २१ जून २०१५ पासून जागतिक योग दिवस साजरा केला जाऊ लागला २१ जूनच का हाच दिवस का निवडला जातो असे आपल्या मनात येते त्याचे कारण २१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळ पर्यंत उजेड असतो या दिवशी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते म्हणजेच हा दिवस सर्वात मोठा दिवस व रात्र लहान असते योगा हा शारीरिक मानसिक आणि अध्यात्मिक साधनेची परंपरा असून शरीर व मन यांचे परिवर्तन घडवण्याचे काम योगा करते नियमित योग केल्याने आपण अनेक प्रकारच्या आजारांपासून मुक्त होत असतो मन आणि शरीर दोघेही सुदृढ होतात योगाचे आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे कारण योगासने गंभीर आजारापासून आपल्याला दूर ठेवतात सध्याच्या युगात आजाराने थैमान घातले आहे जेव्हा आपण नैसर्गिकरित्या तंदुरुस्त राहण्यावर भर दिला पाहिजे अगदी सुरुवातीपासून आरोग्यासाठी लाभदायक मानला जाणारा योग वैज्ञानिक रिसर्च मध्ये दावा केला गेला की आरोग्याशी निगडित असे आजार यापासून योग आपली सुटका करतो मुळातच योगा हा आजाराला आपल्या जवळही येऊ देत नाही.

आपणा सर्वांना ठाऊक आहे की सध्याच्या काळात प्रदूषण आणि वेगवेगळे आजार यांनी थेट आपल्या श्वसनक्रिया व यावर हल्ला केला आहे श्वास घ्यायला रुग्णांना त्रास होत आहे श्वास घेण्यात अडथळा येत आहे आणि त्याचाच परिणाम थेट फुफुसावरही होतो योगामध्ये असे अनेक प्रकार आहेत की त्यामुळे आपली श्वसन क्रिया मजबूत करण्यासाठी तुम्ही प्राणायाम करणे उचित ठरू शकते अनेक रोगांविरुद्ध लढण्याची हवी असलेली प्रतिकारक्षमता वाढविण्याचे काम योगा करते अशा आजारांमध्ये कोणतेही रामबाण औषध नसल्याने व्यक्तीची प्रतिकारक्षमता महत्त्वाची ठरत आहे शरीरातील सांधे लवचिक बनवण्यासाठी शरीर निरोगी राखण्यासाठी अंतर्गत अवयवांना कसरत मिळण्यासाठी शरीर बांधेसूद होण्यासाठी मन शांत व एकाग्र करण्यासाठी योगा फार महत्त्वाचा आहे



सशक्त शरीर आणि प्रसन्न आणि उत्तम आरोग्य नियमित योगा केल्याने मिळते शारीरिक स्तरावर होणारे फायदे आपल्या लक्षात येतात परंतु श्वसन शरीर मन यांचे संतुलन राखले गेल्याने जीवनाचा प्रवास शांतपणे होतो आणि मानसिक तणावापासून सुटका होऊन गाढ झोप लागते.

योगाचे सर्वात महत्त्वाचे फायदे शरीराच्या सर्व स्तरावर तंदुरुस्ती, वजनात घट, ताण-तणावापासून मुक्ती, अंतर्यामी शांती, रोगप्रतिकारक शक्ती वाढते सजगतेत वाढ ऊर्जा शक्ती वाढते शरीराची लवचिकता आणि शरीराची ठेवण सुधारते शरीराची लवचिकता शरीराची ठेवण याचबरोबर आनंद प्रेम आणि उत्साह तुमच्या जीवनात उत्स्फूर्तपणे व्यक्त झाला तर खरी आरोग्य संपदा संपन्नता योगामुळे आपल्या जीवनात प्राप्त होते जसे मन हे सतत कुठल्या ना कुठल्या क्रियेत गुंतलेले असते नेहमी भूतकाळ भविष्यकाळ याचाच विचार करून त्या भोवती फिरत असते वर्तमान काळात कधीच राहत नाही योगाने आपल्यातील सजगता वाढवून मनाची स्थिती आपण सहज ओळखू शकतो मनाला शांत करू शकतो आणि वर्तमान काळात आणू शकतो योग एक कल्पवृक्षाप्रमाणे आहे आपल्याला अगदी शरीर स्वास्थ्य प्राप्ती पासून तर भव्य बंध मनापासून मुक्त करण्या इतकी क्षमता योगात आहे मात्र या योगाची साधना आपण कुठल्या पद्धतीने करतो यावर सर्व अवलंबून आहे प्रत्येक जन्माला आलेल्या प्राण्याला जन्मतःच एक सुप्त शक्ती मिळत असते या शक्तीला चैतन्य शक्ती किंवा प्राणशक्ती अशी नाव आहेत होमिओपॅथींनी व निसर्गोपचार पद्धतीने स्पष्ट सांगितले की एखाद्या व्यक्तीमधील चैतन्य शक्ती क्षीण झाली की ती व्यक्ती आजारी पडते आपण चैतन्य शक्तीचा वेगवेगळ्या पद्धतीने नाश करीत आहोत कर्मेंद्रिय ज्ञानेन्द्रिय आणि मन बुद्धी चित्त अहंकार यामार्फत बाह्य जगताचा सातत्याने उपभोग घेत असतो पर्यायाने शक्ती खर्च होत असते याची आपल्याला जाणीव देखील होत नसते पर्यायाने आपण आपल्या इंद्रिय व अवयवांचा आवश्यकतेपेक्षा जास्त वापर केला तर चैतन्य शक्तीचा नाश होऊन आजारपण वाढते यापासून मुक्त होण्याचा योगा हा एकच मार्ग आहे यामुळे शरीरातील वात, पित्त यापासून मानवाची सुद्धा सुटका होते.

आज-काल आपण प्रदूषणाबद्दल सजग आहोत परंतु मनुष्याच्या आतील अंतर्गत प्रदूषणाचे काय माणसातील प्रदूषण म्हणजे आजार प्रदूषण, विचार प्रदूषण, प्रदूषण शरीर मन इच्छा धारणा हे सुद्धा जेव्हा दूषित होतात तेव्हाच खरे तर अंतर पर्यावरण शुद्धी ची गरज असते ही शुद्धी साध्य करण्यास योगा अभ्यासाची मदत होते आपली शुद्धी करणे कृती कर्तुत्व विचार हे संस्कारातून व मनो धारणेतून तयार होते प्रत्येक कर्मा मागे अंतकरणाची शुद्धी व परिपक्वता आवश्यक आहे सध्या धकाधकीच्या जीवनात ताण-तणाव आणि घाई पाहता असे दिसते की आपण मूळ स्वरूपापासून खूपच दूर चाललो आहोत म्हणूनच आचार विचार यांच्यात तफावत दिसते कोणत्याही क्षेत्रात तसेच सामाजिक आणि कौटुंबिक ठरावावर माणसे एकमेकांपासून दूर होत चालली आहेत आपण अंतर्मुख होत चाललो आहोत ही आपल्यातली अंतरंग प्रदूषण द्वेष असुर मद मोह लोभ काम क्रोध या सर्व जंजाळात सुखाचा पाया हरवला आहे समाधानात निखळ आत्मिक आनंद दडला आहे हे आपण विसरलो आहोत सुख लोभ आणि राग यांनी मिश्रित असून जीव घेण्या स्पर्धेत गुंतले आहे आत्मिक सुख विसरलेल्या आणि भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या मनाच्या आजारांचे मूळ यातच आहे अशा मानसिक आजारांचे मुळापासून निर्मूलन करण्याकरता आज योगाभ्यासाची नितांत गरज आहे श्वास घेतल्याने व सोडल्याने समाधान मिळते आपल्याला आपला श्वास व उशश्वासा द्वारे स्वतःची नाते जोडून समाधानाची एक आगळीवेगळी स्थिती आपण अनुभव घेऊ शकतो तेव्हा समाधानाची गुरुकिल्ली म्हणजे प्राणायाम असे म्हणावयास हरकत नाही.

सध्याच्या वेगवेगळ्या आजारांच्या परिस्थितीत आपण आपली रोगप्रतिकारशक्ती फार चांगली असणे गरजेचे आहे तुम्ही जर दररोज काही वेळ योग साधना केली तर आजारांना दूर ठेवू शकतात आयुष्यात सकारात्मक गोष्टी आत्मसात करणे इतके अवघड नसतं मला वेळ नाही हे जमत नाही ते जमत नाही असे करू नका असा नकारात्मक विचार करून तुम्ही तुमच्या जगण्याचा आनंद हिरावून घेत आहात असे न करता रोज प्राणायाम करा निरोगी रहा आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या योगमय शुभेच्छा.

**डॉ.भूपेंद्र मालपुरे,**
**सचिव- धुळे जिल्हा**
**योगासन स्पोर्ट्स असोसिएशन धुळे**

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदुत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!




महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक SWARAJYADOOT स्वराज्यदूत
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**

PASSWORD PROTECTED PAGE